# प्रेसनोट

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 431/2023 दिनांक : 13.11.2023

## 1)खुन :–

**विमानतळ :–**दिनांक 12.11.2023 रोजी चे 20.30 वा. चे सुमारास, नमस्कार चौक ते एमजीएम कॉलेजचे मेन रोडवरील नाथनगर पाटीजवळ नांदेड येथे, यातील मयत नामे भरत हरीसिंग पवार, वय 36 वर्षे, रा. विस्तारीत नाथनगर नांदेड, यातील आरोपीच्या मोठया भावाचा मयताच्या भावाने खुन केला होता. त्याचा राग मनात धरून यातील नमुद चार आरोपीतांनी कट रचुन नियोजनबध्दरित्या त्याचेवर पाळत ठेवुन त्यास गाठुन इतर दोन आरोपीचे मदतीने पुर्ववैमनशातुन धारदार शस्त्राने यातील मयताचे गळयावर, पोटावर, ऊजवे हातावर जागो जागी वार करून खुन केला. वगैरे फिर्यादी श्रीमती शांताबाई हरीसिंग पवार, वय 48 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. विस्तारीत नाथनगर नांदेड यांनी दिलेल्या फिर्यादवरुन पोस्टे खुन गुरन 375/2023 कलम 302, 120(ब) भादवि कायदा प्रामाण गुन्हा दाखल असुन तपास सपोनि/श्री जाधव, मो. नं. 9765902710 हे करीत आहेत.

## 2)खुनाचा प्रयत्न :–

**नांदेड ग्रामीण :–** दिनांक 12.11.2023 रोजी रात्री 01.00 वा. चे सुमारास, साजीद किराणा दुकानाचे समोर रहीमपुर देघडेअरी नांदेड येथे, यातील साजीद किराणा दुकानाचे समोर रहीमपुर दुधडेअरी येथे प्लॉटचे वादाचे कारणावरून यातील नमुद आरोपीने फिर्यादीवर जिवे गोळी झाडली ती गोळी मौ. रफीक शेख यांचे उजवे पायास मारून खुन करण्याचा प्रयत्न केला. व इतर आरोपीने दगड फेकुन मारले व लाथा बुक्याने मारहाण केली. वगैरे फिर्यादी अल्ताफ खान पि. आयुब खान, वय 22 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. नावघाट करबला रोड पठाण किराणा जवळ इतवारा नांदेड यांनी दिलेल्या फिर्यादवरुन पोस्टे नांदेड ग्रामीण गुरन 815/2023 कलम 307, 324, 323, 34 भादवी सह कलम 3/25, 3/27 भाहका सह कलम 135 मपोका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास पोउपनि/श्री बुक्तरे, मो.क्रं. 9421839066 हे करीत आहेत.

## 3)घरफोडी :–

**विमानतळ :–** दिनांक 08.11.2023 रोजी चे 17.00 ते दि. 12.11.2023 चे 10.30 वा. चे दरम्यान, फिर्यादीचे राहते घर नोमानियानगर चैतन्यनगर नांदेड येथे, यातील फिर्यादी हे लग्न कार्यक्रमासाठी त्यांचे वडीलांचे घरी गेले असता कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे घराचे दाराचे कुलूप तोडुन घरात प्रवेश करून कपाटातील नगदी 30,000/–रू व आठ तोळयाची पायातील चांदीचे चैन किंमती 7,000/–रू ची जुनी वापरती एकुण 37,500/–रूपयाचा ऐवज चोरून नेला आहे. वगैरे फिर्यादी यास्मीनबेगम भ्र. आदील अमशान, वय 38 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. नोमानियानगर, चैतन्यनगर नांदेड यांनी दिलेल्या फिर्यादवरुन पोस्टे भाग्यनगर गुरन 373/2023 कलम 454, 457, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास पोहेकॉ 1334/जाधव, मो.क्रं. 8805859640 हे करीत आहेत.

## 4)मो. सा. चोरीचा प्रयत्न :–

**रामतिर्थ :–** दिनांक 11.11.2023 रोजी चे 20.30 ते 23.30 वा. चे दरम्यान, फिर्यादीचे घरासमोर मौ. खतगाव ता. बिलोली जि. नांदेड येथे, यातील फिर्यादीची मो. सा. क्रमांक एमएच–26/बीझेड–2846 किंमती 40,000/–रूपयाची यातील नमुद तीन आरोपीतांनी संगणमत करून चोरी करण्याचा प्रयत्न केला. वगैरे फिर्यादी दिपक जळबा वाघमारे, वय 26 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. खतगाव ता. बिलोली जि. नांदेड यांनी दिलेल्या फिर्यादवरुन पोस्टे रामतिर्थ गुरन 220/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास पोहेकॉ/2079 तमलुरे, मो. क्रं. 9834255985 हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय,नांदेड

CS Scanned with CamScanner

# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 432/2023 दिनांक : 13.11.2023**

**पोलीस अधिक्षक मा. श्रीकृष्ण कोकाटे, यांनी पोलीस अधिकारी, अंमलदार यांचे कुटूंबिया सोबत साजरी केली दिवाळी...**

दिवाळी सणांची परंपरा खुप मोठी असुन ती भारतवर व विदेशात सुध्दा साजरी केली जाते. परंतु पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार, राज्य राखीव पोलीस दल यांना बंदोबस्तामुळे त्यांच्या कुटूंबासोबत दिवाळी साजरी करणे शक्य होत नसल्याने **मा. श्रीकृष्ण कोकाटे**, पोलीस अधिक्षक नांदेड, यांनी त्यांच्या कुटूंबिया सह पोलीस मुख्यालय नांदेड येथे येऊन रविवारी लक्ष्मीपुजनाचे मुहर्तावर, पोलीस अधिकारी, अंमलदार यांचे कुटूंबिय, इलेक्ट्रॉनिक मिडीया, प्रिंट मिडीयाचे संपादक, व प्रतिनिधी व राज्य राखीव पोलीस दल यांचे सोबत दिवाळी सण साजरा करण्यात आला.

सर्व प्रथम **मा. श्रीकृष्ण कोकाटे**, पोलीस अधिक्षक साहेब, **श्रीमती स्नेहल कोकाटे**, व अपर पोलीस अधिक्षक भोकर विभाग यांनी दिवाळी सणांच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या. उपस्थितीतांना अल्पोपहार देण्यात आला. दिवाळी सणा निमित्त पोलीस अंमलदार व राज्य राखीव पोलीस दलांतील अंमलदारांना मिठाई वाटप करण्यात आली.

सदर कार्यक्रमाचे आयोजन मा. **श्रीकृष्ण कोकाटे**, पोलीस अधिक्षक नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली, मा. **श्री जगदीश भंडरवार**, पोनि स्थागुशा, मा. श्री. **विजय धोंडगे**, राखीव पोलीस निरीक्षक पो. मु. नांदेड, व त्यांचे अधिकारी व अंमलदार यांनी केले.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय,नांदेड

Scanned with CamScanner